# *महाराष्ट्र विधानपरिषद*

## *दिवसाच्या कामकाजाचा क्रम*

## *गुरुवार, दिनांक ६ एप्रिल, २०१७*

## *(सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)*

*लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —*

*(१) (शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —*

*सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"शासनाने कंपनी करीता कंपनी कायद्यांतर्गत संपादित केलेला मौजे कोलशेत जि.ठाणे येथील स.न ९९(२) हा भुखंड औद्योगिक प्रयोजनार्थ मे.ओरीएंटल इंडस्ट्रीज ने विकत घेणे, सदर भुखंडाचा औद्योगिक प्रयोजनार्थ वापर न करता तो विकासकास विक्रीचा प्रयत्न करणे, सदर प्रयत्नास यश न आल्याने त्याचे हक्क विकासकास देणे, सदर अधिकाराच्या आधारे मे मॅन इन्फ्रा यांनी मौजे कोलशेत येथील ११४(४) व ११५(२) या क्षेत्रा समवेत स.न ९९(२) सह एकत्रीत विकास परवानगी संदर्भात अर्ज करणे, स.न ११४(४) व ११५(२) मध्ये आदिवासी कुळ असतांना व स.न. ९९(२) ही जमीनीच्या ७/१२ वर भोगवटदार वर्ग २ चा उल्लेख असतांना महानगरपालिका, ठाणे यांनी तिन्ही सर्व्हे नं. च्या एकत्रीत आराखड्यात विकास परवानगी देणे, यातील आरक्षित क्षेत्रात विकासहक्क देणे, महाराष्ट्र जमीन महसुल कायदा, १९६६ चे कलम ४२ अ व भुसंपादन अधिनियम व भुसंपादन (कंपन्या बाबतचे) नियम, १९६३ मधील तरतुदीचे उल्लंघन करणे, सदर विकास परवानगीचे आधारे विकासकाने सदर प्रकल्पाचे काम सुरु करणे, सदर प्रकल्पाची जाहीरात सुरु करणे, प्रदर्शनास स्टॉल लावुन सदनिका विक्री करुन या मालमत्तेत त्रयस्त हितसंबंध निर्माण करणे, पर्यायाने सर्वसामान्य गुंतवणुकदाराची गुंतवणुक व शासनाच्या हितसंबंधांना बाधा आणणे, या सर्व बाबी प्रधान सचिव(महसुल) तसेच प्रधान सचिव (वने, भुसंपादन), मंत्री, महसुल यांना दिनांक २५ जानेवारी, २०१७ चे पत्रान्वये निदर्शनास आणणे, त्याची दखल न घेतल्याने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी यासंदर्भात पुन्हा पत्र देवुन देखिल त्याची दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."*

*(बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना) —*

*(२) श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. हेमंत टकले, किरण पावसकर, धनंजय मुंडे, ॲड. जयदेव गायकवाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. नरेंद्र पाटील, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, जयवंतराव जाधव, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री. अमरनाथ राजूरकर, सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. राहुल नार्वेकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या साडेतीन वर्षापूर्वी तर कॉम्रेड गोंविद पानसरे यांची हत्या दोन वर्षापुर्वी करणारी सनातन संघटना आणि या दोघांच्या खुनाचे आरोपी असणारे एकच असणे, परंतु आजपर्यंत खुनाच्या कटासाठी वापरण्यात आलेली मोटर सायकल आणि पिस्तुल तपास यंत्रणेला न सापडणे, सी.बी.आय. ने आरोपींनी पिस्तुलातुन झाडलेल्या गोळया/पुंगळया स्कॉटलँड यार्डच्या न्यायवैधक शाळेत पाठवुन दहा महिन्यानंतरही त्यांनी अहवाल न देणे, कर्नाटकातील विचारवंत डॉ. एम.एम.कुलबुर्गी यांच्यासह दाभोलकर, पानसरे यांच्या हत्येचा कट एकाच उद्देशाने करण्यात येणे, तरी सुध्दा तीनही हत्यांचा तपास तीन वेगवेगळया तपास यंत्रणानी करणे, एक आरोपी समीर गायकवाड याच्यावर आरोप निश्चिती होणे तर डॉ. विरेंद्रसिंह तावडे या आरोपीवर अद्याप आरोप निश्चित न होणे, फरार आरोपी आकोलकर आणि पवार यांचा तपास यंत्रणांना सुगावा न लागणे, यामुळे जनतेमध्ये वाढत असलेला असंतोष आणि चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."*

*(३) सर्वश्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"महाराष्ट्र शासनाने बृहन्मुंबई महापालिका क्षेत्रातील सफाई कामगारांच्या घरांबाबत धोरण ठरवून सुमारे २८ हजार कामगारांना मालकी हक्काची घरे उपलब्ध करुन देण्याबाबत आदेश निर्गमित केले असणे, मात्र वरळी येथील सर्व्हे क्र.१७/४७ वरील १२,१३०.०७ चौ.मी. क्षेत्रफळाच्या भुखंडावरील सफाई कामगारांच्या ५ बैठ्याचाळी नियमीत करण्याच्या दृष्टीने तेथील कामगारांची नियोजित गृहनिर्माण संस्था*

*स्थापन करण्याकरिता महानगरपालिकेच्या सुधार समितीने माहे नोव्हेंबर २००९ मध्ये मान्यता दिल्यानंतरही तेथून मेट्रो ट्रेन प्रकल्प होणार असल्याने तेथील ६१ भाडेकरुंच्या पुनर्वसनाची योजना तयार करण्यात आली असणे, परंतु त्याच ठिकाणी असलेल्या महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या ११८ सफाई कामगारांना दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत घरे रिकामी करण्याकरिता महापालिकेकडून नोटीस देण्यात आली असणे, सदर सफाई कामगार महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागाकडून बांधण्यात आलेल्या चाळींमध्ये राहत असल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य योजनेमध्ये समाविष्ट करण्यात न येणे, त्याचप्रमाणे त्यांना पुनर्वसनाच्या योजनेमध्येही समाविष्ट न करणे, परिणामी या चाळींमध्ये वर्षानुवर्षे राहणाऱ्या महापालिकेच्या सफाई कामगारांना रस्त्यावर येण्याची आलेली पाळी, यामुळे तेथील कामगारांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तेथील अन्य इमारती प्रमाणे १३ चाळीतील सफाई कामगार भाडेकरुंना न्याय देण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्था स्थापन करण्याची परवानगी देण्याची व मेट्रो ट्रेनच्या प्रकल्पामुळे त्यांचे होणारे नुकसान टाळण्याच्या दृष्टीने त्यांचे पुनर्वसन करण्याची योजना आखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(४) श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील १. मौजे विरार सर्व्हे क्र.६२ हिस्सा क्र.१० मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, २. मौजे विरार सर्व्हे क्र.६१, हिस्सा क्र.१०,११, सर्व्हे क्र.६२ हिस्सा क्र.३, सर्व्हे क्र.६३, हिस्सा क्र.१३,१४ मेसर्स साई स्मृती कंस्ट्रक्शन, ३. मौजे निळेमोरे सर्व्हे क्र.३४, हिस्सा क्र. ३ भाग व ४ भाग, भागीदार प्रदिप रामचंद्र गुप्ता या तिनही ठिकाणी नगरविकास विभागाने मान्य केलेल्या नकाशा व्यतिरिक्त मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकाम केलेले असणे, तसेच उपरोक्त तिनही प्रकरणात विकासकांनी शासकीय बनावट कागदपत्र तयार करुन सामान्य जनतेची फसवणुक केलेली असणे, याबाबत पोलीस खात्यामध्ये वारंवार तक्रार करुन देखील विकासकावर भा.दं.वि.स कलम ४०९, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१ व ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात न येणे, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, उपरोक्त प्रकरणी गृह विभागाने प्रकरणांची शहानिशा करुन याबाबत नियमांची व कायद्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

(५) *सर्वश्री. संजय दत्त, शरद रणपिसे, हेमंत टकले, सुनिल तटकरे, नारायण राणे, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"नवी मुंबई मधील खारघर येथे दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी डीएनए वृत्तपत्राचे पत्रकार सुधीर सूर्यवंशी यांच्यावर अज्ञान व्यक्तींकडून हॉकी व लोखंडी रॉडने हल्ला करुन गंभीर जखमी केल्याची घडना घडणे, गेल्या काही दिवसात पत्रकार आणि व्हिडीओ जर्नलिस्ट यांच्यावर हल्ले आणि धमक्या देण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या असणे, झी चोवीस तासचे संपादक डॉ.उदय निरगुडकर, साप्ताहिक राजसत्ताचे संपादक वसंत माने, पत्रकार संजय गिरी, विनोद यादव, संदिप भारती, स्वाती नाईक, सुधीर सुर्यवंशी यांच्या बाबतीत या घटना घडल्या असणे, सुर्यवंशी, नाईक, भारती आणि गिरी यांच्यावर तर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, टि.व्ही. जर्नलिस्ट असोसिएशन या सर्व घटनांचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करणे, संबंधितांवर कठोर कारवाई करावी अशी मागणीही सरकारकडे करण्यात येणे, माध्यमांचा प्रभाव वाढत असताना पत्रकारांना त्यांच्या अभिव्यक्ति स्वातंत्र्यानुसार काम करुन न देणे हे लोकशाहीला घातक ठरणार असणे, लोकशाही अधिक सक्षमपणे राबवली जावी याची जबाबदारी सरकारची असणे, म्हणूनच पत्रकारांना सरंक्षण देणारा कायदा लवकरात लवकर आणून लोकशाहीचा चौथा स्तंभ अधिक मजबूत करावी अशी अपेक्षा सरकारकडून करण्यात यावी अशी पत्रकारांची मागणी असणे, पत्रकारांवर वारंवार हल्ले होत आहेत हे गंभीर बाब असणे, पत्रकारांवरील हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर त्यांना विशेष संरक्षण मिळावे आणि त्याकरिता कायदा करण्याची खूप वर्षापासूनची मागणी असणे, सन २०१६ या हिवाळी अधिवेशनामध्ये पत्रकारांना संरक्षण देणे, पेन्शन देणे, घरांचा प्रश्न सोडविण्याबाबत प्रश्न उपस्थित केला असता मा.मुख्यमंत्री महोदयांनी पत्रकांरावरील होणारे हल्ले रोखण्याबाबत कायद्यात तरतूद करण्यात येईल, पेन्शन आणि घरांचा प्रश्न तातडीने सोडविण्यात येईल असे आश्वासन दिले होते, परंतू दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करण्यात न येणे, पत्रकारांना हक्कांचे घर मिळावे, संरक्षण मिळावे, पेन्शन सुरु करावी अशा अनेक मागण्या प्रलंबित असणे, पत्रकारांवर हल्ले करण्याच्या घटनेत वाढ होत असताना त्यांच्या सुरक्षितेबाबत शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात येत नसणे, राज्यातील पत्रकारांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी शासन अक्षम्य दुर्लक्ष करीत असल्याने शासनाबाबत तीव्र असंतोष व चिडीची*

*भावना निर्माण होणे, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्यामुळे सरकारने वेळोवेळी पत्रकारांसाठी कायदा आणू असे दिलेल्या आश्वासनाची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."*

*(६) ॲड. अनिल परब, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"मौजे दहिसर, ता.बोरीवली येथील सर्व्हे नं. २०९ हा सुमारे १४ एकर भुखंड महसूल अधिकाऱ्यांच्या संगनमताने खाजगी व्यक्तीमार्फत हडपण्याची धक्कादायक बाब माहे मार्च, २०१७ च्या दरम्यान निदर्शनास येणे, सदर भूखंडावर हाजी अली महंमद यांचे नाव खोत म्हणून सातबारा पदरी असणे, तसेच त्यापैकी १२ एकर शेतजमीन श्री. जगदेव बचई अहिर यांच्या कब्जे वहिवाटीस असून त्यावर चाळ व इतर बांधकाम असतांना देखील हायकोर्ट सुट क्र.३४१५/१९४७ अन्वये नेमलेल्या कोर्ट रिसिव्हर मार्फत सन २००७ मध्ये लिलावाद्वारे श्रीमती सुनिता खिमल यांनी परस्पर स्वत:च्या मालकी हक्काच्या कंपनीस विक्री करणे, शासनाच्या पुर्वपरवानगी शिवाय सदर विक्रीस मान्यता नसतानाही बेकायदेशीररित्या झालेल्या विक्रीमुळे कब्जेदारांच्या वारसांचा डावलण्यात आलेला हक्क, विकत घेणारा पक्षकार शेतकरी नसतांनाही सदर विक्रीची नोंद गैरमार्गाने महसूल दफ्तरी करण्यात येणे, विक्री दस्तऐवज नोंदणीकृत करत असतांना कब्जेदारांच्या वारसांचे कोणतेही संमतीपत्र न घेता परस्पर झालेले बेकायदेशीर खरेदीखत, त्यातच विकत घेणाऱ्या पक्षकारांनी सदर भूखंडावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी प्राधिकरणास सादर केलेला अर्ज, त्यावर कब्जेदारांनी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा अधिक्षक, भुमी अभिलेख, झो.पु.पा व तहसिलदार, बोरीवली यांनी नोंदविलेले अस्पष्ट अभिप्राय, त्यानुषंगाने विधी सल्लागाराचे मत मागविण्यास झालेला विलंब, ८० वर्षांपासून कसणाऱ्या कब्जेदारास भूमिहीन करण्याचा होत असलेला प्रयत्न, परिणामी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत झोपडपट्टी धारकांची होत असलेली फसवणूक, या सर्व प्रक्रियेकडे महसूल विभागाने जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिकांत पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(७) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे गृहनिर्माण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"मुंबई उपनगरातील मागाठाणे गाव बोरीवली पुर्व येथे दिनांक २० जून, २००४ रोजी देवीपाडयात सि.टी. सर्व्हे क्र. २०९ ते २१३*

*येथील जमिनीवर एसआरए प्रकल्प राबविण्यासाठी देवीपाडा वेल्फेअर असोसिएशनच्या पहिल्या सभेत मे. निओ मॉर्डन आर्किटेक्ट व विकासक एमआर कन्स्ट्रक्शन यांची नियुक्ती करण्यात येणे, सदर जमिन ही पश्चिम द्रुतगती महामार्ग याला लागून असल्याकारणाने व या जमिनीवर प्रवेश करण्यासाठी नियमानूसार मार्च, २००१ नंतरच्या कायद्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांचे ना हरकत प्रमाणपत्र न घेता सन २००१ पूर्वीचा नियम सादर करुन सदर एसआरए प्रकल्पाला कोणत्याही कागदपत्रांची पुर्ततेअभावी केवळ तीन दिवसात परवानगी देण्यात येणे, खोटे सर्वेक्षण करुन स्वतःच्या (विकासकाच्या) फायद्यासाठी परिशिष्ट - २ मध्ये बनावट आणि नकली झोपडपट्टी धारकांची नावे सामील करणे, सदर घोटाळा माहितीच्या अधिकारात उघड होणे, सदर एसआरए प्रकल्पाची स्थापना २००४ मध्ये झाली असताना आपल्या बाजूने असलेल्या कमिटीला सोबत घेऊन दिनांक ९ जानेवारी, २००१ रोजी खोटया कागदपत्राच्या आधारे पश्चिम द्रुतगती महामार्गाकडून पुनर्विकास प्रकल्पात प्रवेश करण्यासाठी परवानगी मिळविणे, सदर विकासकाने आपल्या कुटुंबातील व्यक्ती, नातलग व कामगार यांची नावे समाविष्ट करुन बोगस झोपडपट्टीधारकांना एसआरए योजनेचा लाभ देण्यात येणे, म्हाडातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना हाताशी धरुन त्यांच्या संगमनमताने बेकायदेशीररित्या जागेवर कब्जा करुन त्यावर बांधकाम करण्यात येणे, सदर प्रकल्पात असलेली मंदिरे ५०० चौ.फुट ऐवजी २०० फुटांची मंदिरे बनवून देण्यात येणे, सदर विकासकाने एसआरए प्रकल्पाच्या नजीकची जवळजवळ २० हजार चौ.फुट जागा अनधिकृतपणे ताब्यात घेवून त्यावर खाजगी बांधकाम करण्यात येणे, सन २००८ साली संपूर्ण सोयी-सुविधेअभावी इमारतीचा ताबा देण्यात येणे, याबाबत स्थानिक पात्र झोपडपट्टी धारकांनी तक्रारी करुनही शासनाकडून अद्याप विकासकावर कारवाई करण्यात आलेली नसणे, त्यामुळे शासनाविरुध्द असंतोषाचे वातावरण पसरणे, सदर एसआरए धारकांना न्याय मिळवून देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व उपाययोजना."*

*(८) श्री. विनायक मेटे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"आकृती निर्माण लिमिटेड, (हबटाउन,) एम.आय.डी.सी. अंधेरी (पूर्व) यांना सन १९९५ मध्ये आंबेडकर नगर, अष्टविनायक अशा एकुण नऊ विभागांमधील ३००० झोपड्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मंजूरी देणे, या योजनेला २० वर्ष पूर्ण झालेली असून, सन १९९५ च्या मंजुरी आराखडयामध्ये ३००० झोपडीधारकांचे आता*

*५००० झोपडीधारक होऊनही ही योजना अद्यापपर्यंत पूर्ण न होणे, ही सर्व जागा एम.आय.डी.सी.च्या मालकीची असणे, यामध्ये पात्र लोकांना ताबा न देता ३८० अपात्र, व्यापारी व ज्यांना नवीन इमारतीमध्ये ताबा दिलेला असतानाही त्याच लोकांची जुन्या जागेवरील दुकाने चालू ठेवणे, तसेच योजने अंतर्गत ॲनेक्स् (विस्तारीत) इमारतीमध्ये शासनाने मंजुरी दिलेल्या बालवाडी, सोसायटी कार्यालय, समाजकल्याण केंद्र इत्यादींना मंजूरी असतानाही त्या जागेवर हॉटेल, जिमखाना चालू करणे, आकृती स्टार बिल्डींगच्या बाजूला असणाऱ्या व्ही मॉल मध्ये वाटप केलेल्या गाळाधारकांच्या झोपडया इथे नसतानाही त्यांना गाळयांचे वाटप केलेले असणे, पुनर्वसीत इमारती, सेल इमारतींना परवानगी देण्यात आलेल्या व त्यांच्या क्षेत्रफळामध्ये तसेच पूर्ण व अपूर्ण बांधकामामध्ये प्रचंड तफावत असणे, आंबेडकरनगर व अष्टविनायक या नवीन इमारतीमधील रहिवाशांना सदनिकेची लॉटरी न काढता १२५ सदनिकांचे वाटप करण्यात येणे, या योजनेअंतर्गत विकासकाने प्रचंड भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस येणे, यामुळे विकासक, प्रशासन व शासनाबददल पसरलेला तीव्र असंतोष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(९) सर्वश्री. धनंजय मुंडे, प्रविण दरेकर, सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील विळे भागाड एमआयडीसीत मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील लि. कंपनी कार्यान्वीत असणे, या एमआयडीसीसाठी माणगांव तालुक्यातील तासगांव, भागाड, येलावडे, विळे, सणसवाडी आदी भागातील गोरगरीब शेतकऱ्यांच्या जमीनी अत्यल्प मोबदल्यात संपादीत केलेल्या असणे, जमीनी संपादीत करतांना स्थानिक भूमिपुत्रांना नोकऱ्यामध्ये तसेच रोजगारामध्ये प्राधान्य देण्याचे बंधन असणे, त्याचबरोबर या कंपन्यांमार्फत शाळा, कॉलेज, प्राथमिक आरोग्य केंद्रे तसेच अंतर्गत रस्ते व ग्रामपंचायतीच्या सक्षमीकरणाच्या सोई पुरविणे बंधनकारक असणे, मे. पॉस्को महाराष्ट्र स्टील कंपनी कार्यान्वीत झाल्यानंतर सदर कंपनीने स्थानिक नागरीकांना रोजगारापासून हेतुपुरस्सर डावललेले असणे, वेगवेगळया प्रकारचे कंत्राट जाणीवपुर्वक जिल्हाबाहेरील कंत्राटदारांना देण्यात येणे, कंपनीमध्ये उच्च पदावर कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांनी आपापल्या जिल्ह्यातील कामगारांची मोठ्या प्रमाणात भरती केलेली असणे, माणगांव तालुक्यातच डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ असतांना या विद्यापीठातील पदवीप्राप्त विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची रोजगाराची*

*संधी उपलब्ध केलेली नसणे, कंपनी ॲक्ट नुसार सामाजिक दायित्वाची २ टक्के रक्कम सामाजिक कार्यासाठी खर्च करणे बंधनकारक असतांना या फंडाचा गैरवापर करणे, आरोग्याच्या दृष्टीने सोईसुविधा देणे बंधनकारक असताना या कंपनीने काळ नदीमध्ये ॲसीड मिश्रीत पाणी सोडल्याने प्रदुषण होत असणे, त्यामुळे या भागातील सुमारे १५ हजार लोकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, या कंपनीच्या ॲसीड मिश्रीत बाहेर सोडलेल्या पाण्यामुळे या भागातील अनेक बोअरवेल व नद्यांचे पाणी पिण्यायोग्य नसल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिलेला असणे, या सर्व गोष्टीमुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त तरुणांमध्ये पसरलेली नैराश्याची भावना, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे कंपनीने केलेले हेतुपुरस्सर दुर्लक्ष, जिल्ह्याबाहेरील कामगारांची केलेली नोकर भरती, या सर्व पार्श्वभूमीवर कंपनीविरुध्द कडक कारवाई करण्याची स्थानिकांमधून होत असलेली मागणी, याबाबत शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(१०) सर्वश्री. अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषि मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"शेतकऱ्यांच्या कृषि उत्पादन क्षमतेवर विपरीत परिणाम होवू नये म्हणून आंतरराष्ट्रीय पर्यावरण नियम व कायद्यानुसार प्रत्येक बीटी कॉटन बियाणांच्या ४५० ग्रॅम पिशवी सोबत १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणे विक्री करणे बंधनकारक असणे, कायदा आणि नियम धाब्यावर बसवुन राज्यात बीटी बियाणांसोबत नॉन बीटी ऐवजी १२० ग्रॅम बीटी बियाणांची विक्री करण्यात येणे, यामुळे राज्यातील कापुस उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होणे, बीटी बियाणांसोबत दिल्या जाणाऱ्या १२० ग्रॅम नॉन बीटी बियाणांची तपासणी नुकतीच नंदूरबार येथे शेतकऱ्यांच्या तक्रारीनंतर करण्यात येणे, तपासणीमध्ये हे बियाणे बीटी बियाणे असल्याचे सिध्द होणे, या संदर्भात दाखल तक्रारीवरुन राज्यात कृषी अधिकाऱ्यांनी बियाणे विक्री करणाऱ्या कंपन्यांविरुध्द कोणतीही कारवाई न करणे, या बाबतच्या तक्रारी आणि त्यावरील अपीले मोठया प्रमाणावर प्रलंबित ठेवून अधिकारी आणि कंपनी यांच्या आर्थिक संगनमताने शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणावर आर्थिक नुकसान होणे, अनेक ठिकाणी बियाणांप्रमाणे बोगस रासायनिक खते विक्रीचेही प्रकार उघडकीस येणे, नुकतीच हिंगोली येथे शेतकऱ्यांच्या दबावापोटी खताचा नमुना प्रयोगशाळेत तपासला असता त्यामध्ये माती असल्याचे सिध्द होणे, अधिकाऱ्यांकडून या बाबत कारवाई होत नसल्यामुळे बोगस आणि बनावट खत विक्रीला चालना मिळणे, बायो पेस्टीसाईड्सच्या*

नावाखाली शेतकऱ्यांची मोठया प्रमाणावर फसवणूक करुन चायनामेड बोगस औषधांची विक्री मोठया प्रमाणावर होत असणे, जैविक औषधांच्या नावाखाली रासायनिक किटकनाशकांची विक्री मोठया प्रमाणावर राज्यभर होत असणे, बुटीवार जि.नागपूर येथे याबाबत नुकताच गुन्हा दाखल होणे, प्रकरणातील दोषींविरुध्द कडक कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी करणे, बियाणे, खते आणि किटकनाशके यांच्या विक्रीवर निर्बंध आणुन यासंदर्भात कडक कायदा करण्याची मागणी शेतकऱ्यांमधुन करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासन प्रतिक्रिया."

(११) सर्वश्री. जगन्नाथ शिंदे, हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-

"थॅलेसेमिया रोगाचा सामना करणाऱ्या रुग्णांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, यामध्ये बालरुग्णांचे प्रमाण सर्वाधिक असणे, ठराविक कालावधीत ब्लड ट्रान्समिशन, चाचण्या अशी उपचार पध्दती असणाऱ्या या रुग्णांच्या औषधांच्या कोर्समध्ये खंड पडल्यास या रुग्णांच्या यकृताला सूज येण्याची भीती असल्याने त्यांना डेफ्रिजेट आणि डेसिरॉक्स ही  औषधे नियमित देणे  गरजेचे असणे, मात्र ही औषधे सर्वसामान्य दुकानात न मिळता फक्त सरकारी रुग्णालयातच मिळत असणे, दोन महिन्यांपुर्वी ठाणे येथील सिव्हील रुग्णालयातील औषधांचा साठा संपल्याने रुग्णांच्या पालकांना अन्य सेंटर्सचा आधार घ्यावा लागत असताना आरोग्य भवनातून  त्यावेळी हा साठा स्थानिक रुग्णालयांना अल्प प्रमाणात पोहोचविण्यात आलेला असल्याने तो लगेच संपून गेल्याने आता पुन्हा मागील एक महिन्यापासून या औषधांचा साठा संपुष्टात आलेला असणे, आरोग्य विभागाकडे वारंवार चौकशी केली असता टेंडर न निघाल्याने साठा पोहोचविण्यात आला नसल्याचे कारणे देण्यात आलेले असणे, यामुळे याप्रकरणातील आरोग्य विभागाच्या प्रशासकीय कारभाराचा भोंगळपणा यातून स्पष्ट होत असून, साधारणपणे ज्या अत्यावश्यक गोष्टी आहेत त्याची पूर्व तजवीज करून ठेवणे गरजेचे असणे किंवा त्याबाबत काही धोरणात्मक निर्णय घेऊन रुग्णांना कोणत्याही परिस्थितीत अत्यावश्यक औषधे मिळण्यात खंड पडणार नाही याची काळजी घेणे गरजेचे असताना याबाबीकडे संबंधितांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणे, त्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ६०० रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मागील दोन ते तीन महिन्यांपासून अनेक अडचणी व संकटांचा सामना करावा लागणे, थॅलेसेमियाग्रस्त रुग्णांना रोजचा औषधाचा डोस न मिळाल्यास त्यांना होणारा त्रास व

*त्याचा त्यांच्या शरीरावर होणारा परिणाम याची जाणीव असतानाही त्याबाबत योग्य ती उपायायोजना करण्यात अपयशी ठरलेल्या ठाणे सिव्हील रुग्णालय व आरोग्य विभागातील संबंधित दोषींची सखोल चौकशी होऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबरोबरच थॅलेसेमिया रुग्णांना लागणारा औषधसाठा मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देऊन रुग्णांना आवश्यक त्यावेळी उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."*

*(१२) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"मुंबईसह रायगड किनारपट्टीच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना उपचारासाठी अनेकदा मुंबईत यावे लागते हे लक्षात घेऊन त्यांचा वेळ वाचावा या हेतूने प्रायोगिक तत्वावर सागरी रुग्णवाहिका सुरु करण्याचा महाराष्ट्र सागरी मंडळाचा प्रस्ताव असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आलेले असणे, या प्रस्तावानुसार वांद्रे व मांडवा येथे या रुग्णवाहिका तैनात करण्यात येणार असून त्यामध्ये अद्ययावत तंत्रज्ञान असलेली उपकरणे, साहित्ये तसेच तज्ञ डॉक्टरही असतील अशी तरतूद असणे, काही वर्षापूर्वी सार्वजनिक आरोग्य विभागाने दुर्गम भागातील खाडी किनाऱ्यावरील नागरिकांसाठी बोट रुग्णवाहिका सुरु केली असणे, डॉक्टर त्या बोटीतून त्या भागात जाऊन नागरिकांवर उपचार करीत असणे, त्याला चांगला प्रतिसादही मिळालेला असणे त्याच धर्तीवर सागरी रुग्णवाहिका सुरु करण्याचा प्रस्ताव सागरी मंडळाने तयार केलेला असणे, परंतु या प्रस्तावास मंजूरी देण्याबाबत शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी येथील जनमानसांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने जनहित लक्षात घेऊन सदर प्रस्तावाला तातडीने मंजूरी देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(१३) श्री. किरण पावसकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"जेट एअरवेज एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडीट सोसायटीमध्ये मोठया प्रमाणात गैरकारभार सुरु असून संचालक मंडळाच्या संगनमताने संशयास्पद निर्णय घेतले जात असल्याची मार्च, २०१६ च्या पहिल्या आठवडयात गंभीर माहिती उघडकीस आलेली असणे, सदर को.ऑप.सोसायटी राज्य शासनाच्या उप निबंधक कार्यालय, के.पूर्व*

*विभाग यांच्या अधिपत्याखाली येत असणे, सोसायटीचे कार्यकारी मंडळ हे उपविधीतील तरतुदी व कायद्यातील तरतुदीनुसार कामकाज करीत असणे, सभासदांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ३२ मधील तरतुदीनुसार मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली जात नसणे, मागील चार वर्षाच्या लेखापरिक्षण अहवाल देण्यास टाळाटाळ केली जात असणे, कार्यकारी मंडळातील सदस्यांनी कायद्यातील तरतूदीचे तसेच उपविधीचे उल्लंघन करुन कर्जे घेतलेली असणे, संस्थेच्या कायद्यामध्ये नियम, करार याबाबत पारदर्शकता नसल्याने संस्थेच्या प्रशासकीय खर्चात वाढ झालेली असणे, लेखापरिक्षकाच्या संगनमताने आर्थिक फुगवटा दाखविला जात असणे, संस्थेने वाटप केलेल्या ग्राहक कर्ज वाटपामध्ये आर्थिक गैरव्यवहार केलेला असून प्रत्यक्ष वस्तुंच्या बाजारभाव तसेच घाऊक बाजारभाव यामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत असणे, खरेदी-विक्री व्यवहारामध्ये संगनमताने भ्रष्टाचार झालेला असणे, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले संरक्षण, सदर संशयास्पद प्रकरणी उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची लोकप्रतिनिधी, सभासदांनी मा.मुख्यमंत्री, मा. सहकार मंत्री, मा.सहकार राज्यमंत्री तसेच जिल्हा उपनिबंधक, बांद्रा, मुंबई यांचेकडे दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सोसायटीच्या सभासदांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सदर संशयास्पद प्रकरणी सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."*

## *(दुपारी १२.०० वाजता)*

*एक : प्रश्नोत्तरे —*

*(क) तारांकित प्रश्न.*

*(ख) शनिवार, दिनांक १ एप्रिल, २०१७ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.*

*(ग) अतारांकित प्रश्नोत्तरांची सातवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.*

*दोन : शोक प्रस्ताव :-*

*"श्री.मुकुंद त्र्यंबक कुलकर्णी, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव."*

*तीन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.*

*(१) मुख्यमंत्री* : *(क) माहितीचा अधिनियम, २००५ च्या कलम २४ च्या पोट-कलम (४) द्वारे महाराष्ट्र शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीआरटीआय- २००५ / प्र.क्र. २६५/०५/५, दिनांक ११ ऑक्टोबर, २००५ मध्ये केलेली सुधारणा प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक आरटीआय. २०१६ / प्र.क्र.६८ / सहा., दिनांकित ७ सप्टेंबर, २०१६ सभागृहासमोर ठेवतील.*

*(ख) "लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे सन २०१३ या वर्षाचा एकेचाळीसावा व सन २०१४ या वर्षाचा बेचाळीसावा वार्षिक अहवाल तसेच दिनांक ९ डिसेंबर, २०११, दिनांक ९ ऑक्टोबर, २०१२, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३, दिनांक १६ एप्रिल, २०१३, दिनांक २२ मे, २०१३, दिनांक ३० जुलै, २०१३, दिनांक १ ऑगस्ट, २०१३, दिनांक ६ ऑगस्ट, २०१३, दिनांक २१ ऑगस्ट, २०१३, दिनांक ७ सप्टेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक २६ नोव्हेंबर, २०१३, दिनांक १० डिसेंबर, २०१३, दिनांक १९ डिसेंबर, २०१३, दिनांक १९ डिसेंबर,*

*२०१३, दिनांक १ फेब्रुवारी, २०१४, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१४, दिनांक २९ एप्रिल, २०१४, दिनांक ९ मे, २०१४, दिनांक २९ मे, २०१४, दिनांक २३ जून, २०१४, दिनांक २४ जून, २०१४ आणि दिनांक ३० जून, २०१४ रोजीचे विशेष अहवाल त्यावरील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह" सभागृहासमोर ठेवतील.*

*(२) उच्च व तंत्र शिक्षण आणि अल्पसंख्याक विकास मंत्री : (क) "मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा दहावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

*(ख) "गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांचा सन २०१२-२०१३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

*(ग) "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.*

*(३) कृषि मंत्री : "डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांचा सन २००६-२००७ ते २००९-२०१० या वर्षांचे लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.*

*चार : "रोजगार हमी योजना समितीचा चौथा अहवाल सादर करणे."*

*पाच : "अनुसूचित जमाती कल्याण समितीचा पाचवा अहवाल सादर करणे."*

सहा : "उप विधान समितीचा चौथा अहवाल सादर करणे."

सात : "महिलांचे हक्क व कल्याण समितीचा सहावा अहवाल सादर करणे."

आठ : "पांढुर्णा (जि.वर्धा) येथील शासकीय आश्रमशाळेसह राज्यातील अन्य आश्रमशाळा व वसतीगृहातील मुलींवर झालेल्या अत्याचार प्रकरणाची सखोल चौकशी करणे" या विषयावरील महिला संयुक्त तद्र्थ समितीचा अहवाल सादर करणे.

नऊ : विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवणे.

श्री.गोपीकिसन बाजोरिया, वि.प.स. : "अकोला शिवणी विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणासंदर्भात" या विषयावरील विनंती अर्ज सभागृहासमोर ठेवतील.

दहा : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — (असल्यास).

अकरा : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास).

## - मध्यंतर -

बारा : शासकीय विधेयके -

(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.

(१) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"

---------------------------------------------------------------------------

(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) मुख्यमंत्री

(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.

(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.

(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.

*(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.*
*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

-------------------------------------------------------------------------

*(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयंत पाटील, बाळाराम पाटील, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) मुख्यमंत्री* | *(२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.*
*(३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* | *(४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.*
*(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.* | *(६) श्री.संजय दत्त, वि.प.स.*
*(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* | *(८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(९) ॲड.अनिल परब, वि.प.स.* | *(१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.*

-------------------------------------------------------------------------

*(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७"*
*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

-----------------------------------------------------------------------

*(५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १७ — महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) महसूल मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* | *(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

----------------------------------------------------------------

-------

*(६) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७"*
*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) महसूल मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

----------------------------------------------------------------------

-------

*(७) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ – महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७"*
*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ – महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे,* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई* |

*वि.प.स.* *जगताप, वि.प.स.*

*(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.*

*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

----------------------------------------------------------------------

*(८) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० — भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) मुख्यमंत्री* *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद*

*(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*

*(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*

*(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.*

*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

----------------------------------------------------------------------

*(९) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ — शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ — शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात*

*यावे."*

| | |
|---|---|
| *(१) कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

---------------------------------------------------------------------------

*(१०) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) सहकार मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

---------------------------------------------------------------------------

*(११) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) सहकार मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

-----------------------------------------------------------------------

*(१२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १९ – महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"*

-----------------------------------------------------------------------

*(१३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २० – भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २० – भारतीय दंड संहिता आणि फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) मुख्यमंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.शरद रणपिसे,* | *(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.* |

वि.प.स.

(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. (६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स. (८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.

(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स. (१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

-----------------------------------------------------------------------

(१४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २४ — महाराष्ट्र विधानमंडळ सदस्य (निरर्हता दूर करणे) (सुधारणा) विधेयक, २०१७"

(१५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २५ — विश्वकर्मा विद्यापीठ विधेयक, २०१७"

(१६) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २६ — डीएसके वर्ल्ड विद्यापीठ विधेयक, २०१७"

-----------------------------------------------------------------------

(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे.

"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २९ — प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याबाबत (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"

-----------------------------------------------------------------------

(ग) विधानसभेने दुसऱ्यांदा संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६"

-----------------------------------------------------------------------

तेरा : सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, सतेज ऊर्फ बंटी पाटील, संजय दत्त, जयंत पाटील, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, सतिश चव्हाण, किरण पावसकर, ॲड.जनार्दन चांदूरकर, सर्वश्री. जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत

*गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री. अमरनाथ राजूरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्रानी, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री. विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, आनंदराव पाटील, राहुल नार्वेकर, हरिसिंग राठोड, रामराव वडकुते, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री. जगन्नाथ शिंदे, जयदेव गायकवाड, अनिल तटकरे, वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -*

*"कर्जबाजारीपणा, नापिकी, शेतमालाला मिळत नसलेले भाव, अस्मानी संकटे, शेतीविषयक बदलणारी नेहमीची धोरणे, व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक यामुळे राज्यातील शेतकरी त्रस्त असणे, नोटाबंदीच्या निर्णयामुळे कृषी मालाचे भाव कोसळून शेतकऱ्यांचे झालेले अतोनात नुकसान, या सातत्याने येणाऱ्या संकटामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत असणे, मागील ३ वर्षात ९ हजारापेक्षा अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, आत्महत्यांचे हे सत्र अद्यापही सुरूच असणे, जिल्हा बँकांवर लादलेल्या निर्बंधामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला सुरुंग लागणे, डॉ.स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करण्याकडे दुर्लक्ष होणे, घसरलेल्या दरामुळे ऊस, कापूस, तूर, धान, कांदा, टोमॅटो, सोयाबिन, भाजीपाला तसेच संत्रा, केळी उत्पादक शेतकरी कोलमडणे, कडधान्याच्या उत्पादनात विक्रमी वाढ होऊनही गेल्या पाच वर्षातील निच्चांकी भाव शेतकऱ्यांना मिळणे, शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत किंमतीपेक्षा कमी दराने व्यापाऱ्यांकडून सुरू असलेली खरेदी, निर्यात बंदीसारखे हत्यार उपसून कांदा उत्पादकाची केलेली कोंडी, हवामान आधारीत फळ पिक विम्याचा हप्ता शासनाने न भरल्याने हजारो शेतकरी पिक विम्याच्या लाभापासून वंचित राहणे, कोरडवाहू शेती अभियानांच्या आर्थिक तरतूदीत ८० टक्क्यांवरुन अधिक करण्यात आलेली कपात, अपघात योजनेची ५० टक्के रक्कमही शेतकऱ्यांना न मिळणे, कृषि विभागात हजारो रिक्त पदांचा असलेला बॅकलॉग परिणामी योजनांची अंमलबजावणी होण्यात येणाऱ्या अडचणी, खरेदी केंद्रावरील आवक वाढल्याने नाफेड करुन उडीद, तूर खरेदी बंद करण्यात आल्यामुळे खाजगी व्यापाऱ्यांनी दर पाडणे, मार्च महिन्यांतील अवकाळी पावसामुळे मराठवाड्यासह अनेक जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचे पंचनामे व नुकसान भरपाई अद्याप मिळालेली नसणे, चारही बाजूने कोंडी होत असल्याने शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग अंवलबविलेला असणे, शेतकऱ्यांना या कठीण प्रसंगात आधार देण्यासाठी कर्जमाफीचा उपाय असतांना सरकारकडून सातत्याने कर्जमाफीस नकार देण्यात येत असणे, महाराष्ट्र शेजारील*

*आंध्रप्रदेश या राज्याने ७ हजार ९०० कोटी रुपयांचे, तेलंगणा राज्याने १७ हजार कोटींचे, तामिळनाडू राज्याने ५ हजार ७८० कोटी रुपयांचे तर उत्तर प्रदेश राज्याने ३६ हजार कोटी रुपयांचे शेतकऱ्यांकडील कर्ज माफ करणे, याच पार्श्वभूमीवर राज्यातही कर्जमाफीची सातत्याने होणारी मागणी, याच मागणीकरीता सर्व विरोधी पक्षांच्यावतीने दिनांक २९ मार्च ते ४ एप्रिल, २०१७ या कालावधीत चांदा ते बांदा दरम्यान काढण्यात आलेली संघर्ष यात्रा सदरच्या संघर्ष यात्रेत शेतकऱ्यांनी सहभागी होऊन संपूर्ण कर्जमाफीची केलेली मागणी, याकडे शासनाने झालेले अक्षम्य दुर्लक्ष, आर्थिकदृष्ट्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

चौदा : *(बुधवार, दिनांक ५ एप्रिल, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) — [अनुक्रमांक — (क) ते (ङ)] —*

*(क) श्री.सुजितसिंह ठाकूर, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.तानाजी सावंत, प्रा.अनिल सोले, सर्वश्री.गोपीकिसन बाजोरिया, प्रविण दरेकर, ॲड.अनिल परब, श्री.रविंद्र फाटक, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव — (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर) -*

*"राज्यात जनसहभागातून व विविध कार्यकारी संस्थांच्या सहकार्याने जलयुक्त शिवार योजना यशस्वी होणे, सदर योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिक निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, जलसंपदा विभागाकडून मोठ्या प्रमाणावर जुन्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देऊन कामांना गती देण्याचा होत असलेला प्रयत्न, मोठ्या प्रमाणात भूसंपादनाची कामे हाती घेणे, नवीन प्रस्तावांना मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होण्याची आवश्यकता, राज्य सरकारने लिफ (LIIF) इरिगेशनच्या माध्यमातून नाबार्डकडून रक्कम रुपये १२,७७३ कोटी रुपयांचे कर्ज घेणे, जलसंपदा विभागामार्फत मोठ्या प्रमाणावर सुरू असलेले प्रकल्प व अपुऱ्या स्थितीत असलेले प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करण्याची आवश्यकता, कनिष्ठ अभियंत्यांची मोठ्या प्रमाणावर भरती करणे व रिक्त पदे तात्काळ भरण्याची आवश्यकता, शेतकऱ्यांच्या कृषीपंपांच्या जोडणीचे प्रस्ताव जलद गतीने कार्यान्वित केल्याने मागील ५ वर्षांपासूनची कृषीपंपांची प्रतिक्षा यादी १ ते २ वर्षांवर येणे, प्रतिक्षा यादीमधील शेतकऱ्यांना तातडीने वीजपुरवठा करण्याची आवश्यकता, जलयुक्त शिवार व सिंचन*

*योजना मोठ्या प्रमाणावर अंमलात आणल्याने रब्बी पिकात झालेली वाढ, कृषी मालावर प्रक्रिया उद्योग उभे करण्याची कार्यवाही अधिक वेगाने करण्याची आवश्यकता, पीक विमा योजनेत राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घेतलेला सहभाग, शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीस चालना मिळावी, त्यांना मुबलक पाणी मिळावे व अविरत वीजपुरवठा व्हावा या दृष्टीने शासनाने केलेल्या विविध योजनांमुळे राज्यातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्याचे निदर्शनास येणे, राज्य सुजलाम्-सुफलाम् होण्याच्या दृष्टीने शेतकरी हा केंद्रबिंदू मानून त्याला स्वबळावर उभे करण्याच्या दृष्टीने शासनाने अवलंबिलेले धोरण अधिक प्रभावी करण्याची आवश्यकता व शासनाने त्याबाबतीत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*(ख) सर्वश्री.धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, जनार्दन चांदुरकर, जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा. जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, अनिल तटकरे, आनंदराव पाटील, रामराव वडकुते, जगन्नाथ शिंदे, ॲड.राहुल नार्वेकर, ॲड.जयदेव गायकवाड, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -*

*"केंद्र शासनाच्या नोटाबंदीच्या निर्णयामुळे शेतीमालाच्या दरात मोठी घसरण होणे, मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी उत्पादित मालाला बाजारपेठेत भाव नसणे, यामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होणे, राज्यात मागील तीन वर्षात ९ हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, सन २०१६ या एकाच वर्षात सुमारे तीन हजाराहून अधिक शेतकऱ्यांनी आत्महत्या करणे, चालू वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यात केवळ मराठवाड्यात ११७ शेतकऱ्यांनी कर्जबाजारी व नापिकीला कंटाळून आत्महत्या करणे, सततच्या दुष्काळ आणि नापिकीमुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच असणे, दुष्काळ निवारणार्थ शासनाकडून कोणत्याही ठोस उपाययोजना होत नसणे, मागील वर्षी डाळीचे भाव मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे शासनाने डाळ वर्गीय पिकांच्या उत्पादनासाठी प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले, यावर्षी तूरीचे विक्रमी उत्पादन होणे,*

*शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे बाजारपेठेतील तूरीचे भाव मोठ्या प्रमाणावर कोसळणे, शासनाने आधारभूत किंमतीने तूर खरेदी करण्याचा निर्णय घेणे, मात्र तूर खरेदीबाबत कोणतेही नियोजन नसल्यामुळे तूर उत्पादक शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागणे, राज्यात लाखो क्विंटल तूर खरेदी केंद्रावर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकरी आठ ते दहा दिवस रांगेत तूर खरेदीच्या प्रतिक्षेत असणे, तूर उत्पादक शेतकऱ्यांना पैसे मिळण्यासाठी १५ दिवसांपेक्षा जास्त कालावधीची वाट पाहण्याची वेळ येणे, कर्मचारी आणि व्यापारी यांच्या संगनमतामुळे शेतकऱ्यांना कमी भावाने स्थानिक व्यापाऱ्यांना तूर विक्री करण्याची वेळ येणे, कांदा, हरभरा, कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकरीसुध्दा मोठ्या प्रमाणावर अडचणीत असणे, शासनाने शेती मालाचे भाव स्थिर ठेवण्यासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनविरोधी संतापाची भावना असणे, शेजारील कर्नाटक सारख्या राज्याने शेतीमालाला बोनस देण्याचे धोरण स्वीकारणे, मात्र महाराष्ट्रासारख्या कृषिप्रधान राज्यात शेतीमालाला बोनस देण्याचे कोणतेही धोरण नसणे, आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कर्जमाफी करण्याची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असणे, उत्तर प्रदेशात सत्तेवर आल्यास कर्जमाफी करु अशी घोषणा करण्यात येणे, मात्र याच धर्तीवर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि बिनव्याजी कर्ज देण्यासाठी कोणतीही उपाययोजना होत नसणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने कर्जमाफी करुन बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*(ग) सर्वश्री शरद रणपिसे, धनंजय मुंडे, नारायण राणे, सुनिल तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरसिंह पंडित, जनार्दन चांदूरकर, सतीश चव्हाण, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री.किरण पावसकर, सुभाष झांबड, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, रामहरी रुपनवर, नरेंद्र पाटील, अमरनाथ राजूरकर, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, अनिल तटकरे, मोहनराव कदम, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -*

*"राज्यात झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण, शहरीकरण वाढत असताना त्यांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत*

*महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपालिका यांच्यावर पडत असलेला ताण, नविन शहरीकरण होत असल्यामुळे त्याठिकाणी रस्ते, सांडपाणी, घनकचरा व पाणीपुरवठा करणेबाबत स्थानिक स्वराज्य संस्था असमर्थ असणे, शहरीकरण वाढत असले तरी महानगरपालिकांना राज्य शासन पुरेसा निधी देत नसणे, त्यातच एलबीटी रद्द केल्यामुळे महानगरपालिका व राज्य शासन आर्थिक अडचणीत असणे, यापूर्वी केंद्रातील युपीए शासनाने शहरी विकासासाठी अनेक आणलेल्या योजना राज्यशासनाने बंद करणे, जवाहरलाल नेहरु नागरी पुनरोत्थान योजना बंद करुन स्मार्ट सिटी योजना आणणे, परंतु त्यासाठी निधींची भरीव तरतूद नसणे, तसेच अद्यापही स्मार्ट सिटीबाबतचे प्रकल्प अहवाल तयार नसणे, नागरी क्षेत्रात पाणी टंचाईची समस्या दिवसेंदिवस उग्ररुप धारण करीत असणे, मुंबईतील ४ लाख झोपडपट्टीवासियांना झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत स्वत:च्या मालकीची घरे देण्याची घोषणा शासनाने करणे, परंतु अद्यापही याबाबत झोपडपट्टीधारकांना घरे उपलब्ध करुन न देणे, मुंबईतील एसआरए योजनेखाली बांधलेल्या ३५ हजार सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र न मिळणे, झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा केवळ वाढीव चटई क्षेत्र मिळविण्यासाठी विकासक या योजनेचा वापर करुन घेत असणे, ठाणे, जिल्ह्यातील ७ महानगरपालिका क्षेत्रामध्ये निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई, नागपूर शहरातील सिव्हील लाईनचा परिसर वगळता अन्य भागात असलेले खराब रस्ते व पायाभूत सुविधांचा अभाव, पुणे शहरात वाहतुकीची प्रचंड कोंडी, पार्कींगची समस्या, मेट्रो सुरू करण्याची केलेली घोषणा, काही प्रमुख भागात जनतेच्या मागणीनुसार रस्ता रुंदी रद्द न करणे, जुन्या वाड्यांचा पुनर्विकासाचा प्रलंबित असलेला प्रश्न, राज्य शासनाने पुणे शहरातील मेट्रोलगत जाहिर केलेल्या वाढीव चटई क्षेत्राचे होणारे दुरगामी दुष्परिणाम, डंम्पिग ग्राऊंड व कचऱ्याची समस्या, औरंगाबाद शहरासाठी करावयाची समान्तर जलवाहिनी योजना कार्यान्वित न होणे, नारेगाव कचरा डेपोचा प्रलंबित प्रश्न, औरंगाबाद शहरातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था व महापालिकेत नव्याने समाविष्ठ केलेल्या गावांचा निधीअभावी विकास न होणे, राज्यातील पर्यटन क्षेत्रात साईन बोर्ड नसल्यामुळे पर्यटकांना होणारा त्रास, एकूणच राज्यातील नागरी क्षेत्रात सर्वच पायाभूत सुविधांचा अभाव असताना राज्य शासनाचे त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, शहराच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद करण्यास होत असलेली दिरंगाई, त्यामुळे नागरीभागात विकासाचा उडालेला बोजवारा, यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*(घ) सर्वश्री.धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनिल तटकरे, नारायण राणे, हेमंत*

*टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, जयंत पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतिश चव्हाण, कपिल पाटील, किरण पावसकर, ॲड. जनार्दन चांदूरकर, सर्वश्री.जयवंतराव जाधव, रामहरी रुपनवर, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.ख्वाजा बेग, आर्कि. अनंत गाडगीळ, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.अमरनाथ राजुरकर, आनंद ठाकूर, सुभाष झांबड, अब्दुल्लाखान दुर्राणी, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, चंद्रकांत रघुवंशी, नरेंद्र पाटील, प्रकाश गजभिये, आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -*

*"सर्वसामान्यांना मुंबईत म्हाडाच्या माध्यमातून घरे उपलब्ध होण्यासाठी म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासाच्या बदल्यात विकासकाने म्हाडाला अधिमुल्याऐवजी गृहसाठा द्यावा अशी दुरुस्ती करण्यात आलेली असणे, परंतु शासनाच्या नविन गृहनिर्माण धोरणात विकासकाकडून गृहसाठ्याऐवजी पैसे घेण्याची तरतूद करण्यात येणे, शासकीय जमिनीवरील झोपड्यांना एस.आर.ए. अंतर्गत भाडेपट्टा उपलब्ध करुन जागा मालकी तत्वावर देणे, संक्रमण शिबिरात अनधिकृत घुसखोरी केलेल्या घुसखोरांवर कारवाई करण्याऐवजी त्यांना रेडी रेकनर दरानुसार किंवा पंतप्रधान आवास योजनेतून घरे उपलब्ध करुन देण्याची घोषणा करण्यात येणे, एफ.एस.आय.ची खैरात वाटून पायाभूत सुविधेवरील ताण वाढणे, विकासकाकडून विनामुल्य प्राप्त होणाऱ्या पाच हजार सदनिका अद्याप म्हाडाला प्राप्त झालेल्या नसणे, शासनाचे गृहनिर्माण धोरण बिल्डरांच्या सभेत विभागाला थांगपत्ता लागू न देता जाहीर करण्यात येणे, स्थावर मालमत्ता कायद्याच्या अंमलबजावणी करीता होत असलेला विलंब, तसेच राज्यातील निवासी डॉक्टरांवर सातत्याने हल्ले होणे, त्यात डॉक्टरांना गंभीर इजा पोहचणे, वाढत्या हल्यांमुळे डॉक्टरांमध्ये असुरक्षिततेचे वातावरण पसरणे, सुरक्षेच्या मागण्यांसाठी राज्यातील निवासी डॉक्टरांनी रजा आंदोलनाच्या माध्यमातून संप सुरू करणे, संपामुळे राज्यातील रुग्णसेवा ठप्प होणे, उपचाराअभावी रुग्णांचे अतोनात हाल होणे, गंभीर आजारी रुग्णांना प्राण गमवावे लागणे, मा. उच्च न्यायालयानेही संपाची गंभीर दखल घेऊन रुजू न होणाऱ्या डॉक्टरांना बडतर्फ करण्याचा इशारा देणे, मा.न्यायालयाच्या कारवाईच्या इशाऱ्यानंतर "मार्ड" ने संपापासून स्वत:ला वेगळे करणे, न्यायालयाच्या आदेशानंतर, तसेच प्रशासनाने नोटीस बजावूनही डॉक्टर रुजू न होणे, यामुळे राज्यातील रुग्णांच्या जिविताला धोका निर्माण होणे, निवासी डॉक्टरांच्या संपावर तातडीने तोडगा काढून कायमस्वरुपी, परिणामकारक तोडगा शोधणे आवश्यक असणे, तसेच म्हैसाळ (जि.सांगली) येथेही डॉ.खिद्रापुरे यांच्या क्लिनिकमध्ये अनेक गर्भपात*

केलेले असणे, गर्भलिंग निदान करुन स्त्री-भ्रूणाची हत्या करणे, गर्भपातासाठी मिसोप्राससारख्या गोळ्या वापरलेल्या असणे, ही औषधे मुंबईतून अवैधरित्या दलालाकडून खरेदी केलेली असणे, या गर्भपाताच्या रॅकेटमध्ये अनेकजणांचा सहभाग असल्याचे उघडकीस येणे, याप्रकरणी जलदगतीने तपास करणे आवश्यक असणे, या सर्व गोष्टींचा विचार करता राज्यातील डॉक्टरांना संरक्षणाबरोबरच रुग्णांनाही रुग्णसेवा देणे गरजेचे असणे, स्त्री-भ्रूण हत्या रोखण्यासाठी कठोर निर्णय घेणे आवश्यक असणे, आर्थिकदृष्ट्या ग्रासलेल्या राज्यातील झोपडी धारकांना दिलासा देण्यासाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

(ङ) डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री.धनंजय मुंडे, शरद रणपिसे, सुनील तटकरे, नारायण राणे, हेमंत टकले, संजय दत्त, अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतीश चव्हाण, आर्कि. अनंतराव गाडगीळ, सर्वश्री.किरण पावसकर, सुभाष झांबड, जयवंतराव जाधव, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री.चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अब्दुल्लाखान दुर्राणी, आनंदराव पाटील, ख्वाजा बेग, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री.विक्रम काळे, रामहरी रुपनवर, नरेंद्र पाटील, अमरनाथ राजूरकर, प्रकाश गजभिये, हरिसिंग राठोड, अनिल तटकरे, मोहनराव कदम, रामराव वडकुते, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -

"राज्य शासनाने मोठा गाजावाजा करुन मेक ईन इंडिया व मेक इन महाराष्ट्राची घोषणा केलेली असली तरीही सद्य:स्थितीत राज्यात उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणात आलेली मंदी, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, जळगांव, नागपूर, कोल्हापूर, सोलापूर इत्यादी जिल्ह्यासह सर्व औद्योगिक शहरातील बंद पडलेले उद्योग, उद्योग विभागाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत पूर्वी आर्थिक फायदे घेतलेले असणे, परंतु आज त्या जागेवर वर्षानुवर्षे बंद असलेले उद्योग, या हजारो बंद उद्योगांकडे राष्ट्रीयकृत व सहकारी बँकांचे कोट्यावधी रुपयांचे थकीत असलेले कर्ज, कर्ज देणाऱ्या बँकांना अशा बंद उद्योगांच्या प्लॉटवर शासनाच्या नियमामुळे कारवाई करणे शक्य नसल्यामुळे नवीन उद्योगासाठी प्लॉट उपलब्ध करता न येणे, त्यामुळे उद्योगधंद्यांची वाढ थांबणे, परिणामी अनेक उद्योग राज्याबाहेर स्थलांतरीत होणे, नवीन उद्योग निर्माण न झाल्यामुळे ओढवलेली बेरोजगारी, सेस खाली २ हजार एक जमीन घेण्यात येणे, परंतु त्यावर उद्योग निर्मिती करण्यास शासनाची असलेली उदासिनता, महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळाने जमीन मंजूर केल्यानंतर उद्योग घटकास देकार पत्र देण्यास अवाजवी कालावधी

*लागणे, त्यामुळे शासकीय धोरणाबद्दल संभ्रम व निराशेचे वातावरण पसरणे, गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी संपर्क साधून सर्व मंजूऱ्या मिळवून देण्यासाठी मैत्री कक्ष स्थापन करणे, सदर कक्षांकडून कोणतेही सकारात्मक काम न होणे, फक्त आलेल्या तक्रारीचे निरसन करण्यात येत असणे, त्यामुळे मैत्री कक्ष स्थापनेमागील हेतू निष्फळ ठरणे, विविध परवानग्यासाठी उद्योजकांचा छळ होणे, अशा परवानग्या घेत असताना मोठ्या प्रमाणात लाचखोरी होत असल्याचे उघड होणे, उद्योगासाठी वीजेच्या दरात सवलतीमध्ये वेगवेगळया विभागामध्ये दुजाभाव करण्यात येणे, तसेच सातत्याने वाढणारे विजेचे दर उद्योग क्षेत्रातील मंदीमुळे व नोटाबंदीमुळे अनेक छोट्या-मोठ्या उद्योगांवर परिणाम झाल्यामुळे त्यात काम करणाऱ्या कामगारांची रोजंदारी कमी केली जात असणे, किंवा त्यांना कामांवरुन कमी केले जात असल्याने या कामगारांवर बेरोजगारीमुळे आलेली उपासमारीची पाळी, कामगार कायद्यातील त्रुटींमुळे कंत्राटी कामगारांचा प्रश्नही अनेक वर्षे प्रलंबित असणे, शासनाच्या उद्योग क्षेत्राच्या उदासिन धोरणामुळे राज्यात बिकट परिस्थिती निर्माण झाली असून अनेक उद्योग राज्यांबाहेर जात असताना याकडे राज्यशासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी."*

*पंधरा : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) -*

*(१) प्रा.अनिल सोले, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"महाराष्ट्रात तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील सर्व तांत्रिक अभ्यासक्रम (A.I.C.T.E.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या नियमान्वये व निकषानुसार राबविले जात असून प्रत्येक संस्थेत आवश्यक पदे, विद्यार्थी संख्या, कार्यभार इ. बाबींची पूर्तता न केल्यास संस्थेची मान्यता रद्द होणे, तांत्रिक कर्मचारी यांनी वेतनवाढीची मागणी न करता कर्मशाळा निर्देशक/प्रयोगशाळा निर्देशक पदनामाची मागणी करणे, दिनांक १५ डिसेंबर, २००९ रोजी तत्कालीन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, तत्कालीन तंत्रशिक्षण सचिव यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत निर्देशक पदनाम देण्याचे मान्य करुन वेतनवाढ देण्यात येणार नाही असे शासन निर्णय निर्गमित करण्याचे आदेश देणे, दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी संबंधित मंत्र्यांना निर्णय घेण्याचे आदेश दिले असणे, दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी मा.वित्त मंत्री तथा मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीला*

*मा.मंत्री उपस्थितीत असतांनाही त्यांच्या खात्याचे अधिकारी गैरहजर असल्याने निर्णय घेणे शक्य झालेले नसणे, सदर प्रकरणाच्या नस्तीवर संबंधित विभागाकडून नकारात्मक टिपणी सादर करुन प्रकरण दप्तरदाखल करण्याचा प्रयत्न करणे, सदर प्रकरण २० वर्षापासून प्रलंबित असल्याने निर्देशक पदनामाचा शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*(२) श्री. जयंत पाटील, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.*

*"राज्यात २१२६ प्राथमिक आरोग्य केंद्र असून १५५८ आरोग्य केंद्रात २ वैद्यकीय अधिकारी असणे, ६८७ केंद्र २४ तास सुरु असणे, १०५७ केंद्र प्रसुतीसाठी रुग्णआल्यास चालू करणे व नंतर बंद केली जाणे, राज्यातील ८४ आरोग्य केंद्रात व ३४१८ उपकेंद्रात वीज पुरवठा नसणे, १४ ग्रामीण रुग्णालये व ५४८ प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुतिगृह नसणे, ६३ ग्रामीण व ५३० आरोग्य केंद्रात शस्त्रक्रिया कक्ष नसणे, १७५ ग्रामीण, ५८० आरोग्य केंद्र व ४३९३ उपकेंद्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी निवासस्थान नसणे, २१२६ आरोग्य केंद्र व १५० ग्रामीण रुग्णालयात क्ष-किरण यंत्राची सुविधा नसणे आणि राज्यातील १३६३७ उपकेंद्रांपैकी ५०५१ उपकेंद्रात शुध्द पाण्याची सोय नसणे, केंद्र शासनातर्फे १२ एप्रिल, २००५ पासून देशभर सुरु असलेल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचे पाहणी करण्यासाठी नेमण्यात आलेल्या इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ऑडिटर्स ऑफ इंडिया या संस्थेने राज्यात केलेल्या पाहणीतून ही वस्तुस्थिती समोर येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."*

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ५ एप्रिल, २०१७.*

*उत्तमसिंग चव्हाण,*
*सचिव,*
*महाराष्ट्र विधानपरिषद.*